महाराष्ट्र शासन
# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे
४१२-ई, शिवाजीनगर, पुणे - ४११ ०१६.

दूरध्वनी क्र.०२०-२५६५६२३४/२५६५७१७६
Email ID : ropune@dtemaharashtra.gov.in

जा.क्र. :तंशिविकापु/विवि-५/एनजीपी/२०२३/ 1736 दिनांक : 21 APR 2023

## परिपत्रक

प्रति,
प्राचार्य / संचालक,
या कार्यालयाचे अधिनस्त सर्व शासकीय/अशासकीय अनुदानित/
खाजगी विनाअनुदानित संस्था.

**विषय : - स्थापत्य अभियांत्रिकी पदवी तसेच पदविका मध्ये शिकत असलेल्या विद्यार्थ्यांसाठी क्षेत्रभेट आयोजित करणेबाबत..**

**संदर्भ :- १. मा. प्र.उप.संचा. तंत्रशिक्षण संचालनालय, महा.राज्य.मुंबई यांचे पत्र क्र.१०/एनजीपी/२०२३/२९९ दि. १३.०४.२०२३**
**२.मा.प्र.अधि.म.अभि.संशो.संस्था.नाशिक यांचे पत्र सहा. संचा. तंत्रशिक्षण संचालनालय, महा.राज्य.मुंबई यांचे पत्र क्र.मअसंसं/आस्था-३/३८१/२०२३**

उपरोक्त विषयास अनुसरुन संदर्भीय पत्र क्र. २ मध्ये नमूद केल्यानुसार महाराष्ट्र राज्यामध्ये महाराष्ट्र शासनाच्या जलसंपदा विभागांतर्गत स्थापत्य अभियांत्रिकी क्षेत्रामध्ये उच्च दर्जाची अशी महाराष्ट्र अभियांत्रिकी संशोधन संस्था (मेरी) नाशिक येथे कार्यरत आहे. सदर संस्था राज्य स्तरावरील संशोधन संस्था असल्याने संपूर्ण महाराष्ट्र हे मेरीचे कार्यक्षेत्र आहे. राज्यातील जलसंपदा, सार्वजनिक बांधकाम व महाराष्ट्र जीवन प्राधिकरण या विभागातील तसेच राज्याबाहेरील संशोधन विषयक कामे हाताळले जातात.

या संस्थेमध्ये संशोधन कामाव्यतिरिक्त बांधकाम सामग्रीच्या गुणवत्ता चाचण्या, मृद चाचण्या, रस्त्यांच्या चाचण्या, मिश्र संधानक संकल्पन ही कामे केली जातात. तसेच सुदुर संवेदन तंत्राने जलाशयातील गाळ सर्वेक्षणाचे कामे, पीक मोजणीची कामे इ. कामे केली जातात. निमशासकीय आणि खाजगी संस्थाकडून येणाऱ्या कामासंबधीचे उपायोजित संशोधन व चाचणी कामेही केली जातात.

त्यानुषंगाने या विभागीय कार्यालया अंतर्गत येणाऱ्या सर्व संस्थांच्या प्रमूखांना सूचित करण्यात येते की, विद्यार्थ्यांसाठी महाराष्ट्र अभियांत्रिकी संशोधन संस्था (मेरी), नाशिक येथे क्षेत्रिय भेट आयोजित करण्यात यावी जेणेकरुन त्यांच्या ज्ञानात भर पडेल व अभियांत्रिकी कौशल्य वाढण्यास वाव मिळेल. तसेच सर्व संस्थाप्रमूख यांनी संदर्भ क्र. २ च्या पत्राचे अवलोकन करून आपल्या संस्थेचा पत्ता, दुरध्वनी क्रमांक व ईमेल महाराष्ट्र अभियांत्रिकी संशोधन संस्था (मेरी) या संस्थेस संबंधित संस्थाप्रमूख यांनी उपलब्ध करुन देण्यात यावेत.

उपरोक्त विषयासंबंधी आवश्यक कार्यवाही करुन केलेल्या कार्यवाहीचा अनुपालन अहवाल या विभागीय कार्यालयास **संस्थाप्रमूखांच्या स्वाक्षरीसह** info.dteropune@gmail.com **या ईमेलवर सादर करण्यात यावा.**

सोबत : संदर्भीय पत्र.

(डॉ.द.व्यं.जाधव)
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पूणे.

प्रत : प्रोग्रामर, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे यांना संकेतस्थळावर प्रदर्शित करण्यासाठी.

सोबत प्रशासन अधिकारी, महाराष्ट्र अभियांत्रिकी संशोधन संस्था, नाशिक-४२२००४ यांचे **"स्थापत्य अभियांत्रिकी पदवी तसेच पदविका मध्ये शिकत असलेल्या विद्यार्थ्यांसाठी क्षेत्रभेट आयोजित करणेबाबत"** या विषयाचे पत्र जोडले आहे.

----*----*----*----

क्रमांक:१०/एनजीपी/२०२३/ २९९
तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,
३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र. १९६७,
मुंबई-४००००१.

दिनांक : 13 APR 2023

प्रति,

मा.सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती/ औरंगाबाद/ मुंबई/ नागपूर/ नाशिक/ पुणे, त्यांना कळविण्यात येते की, सदर पत्र आपल्या अखत्यारीतील सर्व संस्थांच्या निदर्शनास आणून द्यावे. तसेच त्यांच्या स्तरावरुन उचित कार्यवाही करण्याबाबत कळवावे.

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय पुणे. 20 APR 2023 आवक क्र. 3704

(डॉ. गोविंद संगवई)
प्र.उपसंचालक,
तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रत : कार्यासन क्रमांक २ व २अ, मुख्य कार्यालय, यांना माहिती साठी.

R.P.A.D

**प्रशासन अधिकारी**
महाराष्ट्र अभियांत्रिकी संशोधन संस्था,
नाशिक ४२२ ००४.
दुरध्वनी क्र. ०२५३-२५३११५३
ई-मेल : adm.meri@gmail.com
संकेतस्थळ : www.merinashik.org

सत्यमेव जयते
जलसंपदा विभाग

**Administrative Officer**
Maharashtra Engineering Research Institute,
Nashik 422 004
Phone No. : 0253-2531153
Email:adm.meri@gmail.com
Web : www.merinashik.org

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र.मअसंसं/आस्था-३ /३८१ /२०२३ दि. २८/०२/२०२३

पत्र प्राप्त झाले
28 MAR 2023
आवक लिपिक
तंत्र शिक्षण संचालनालय
३, महापालिका मार्ग, मुंबई-१.

प्रति,

मा.संचालक,
तंत्र शिक्षण संचालनालय,
महाराष्ट्र राज्य, ३, महापालिका मार्ग,
पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई-४००००१

**विषय** :- स्थापत्य अभियांत्रिकी पदवी तसेच पदविका मध्ये शिकत असलेल्या विद्यार्थ्यांसाठी क्षेत्रभेट आयोजित करणेबाबत.

महाराष्ट्र राज्यामध्ये महाराष्ट्र शासनाच्या जलसंपदा विभागांतर्गत स्थापत्य अभियांत्रिकी क्षेत्रातील उच्च दर्जाची अशी महाराष्ट्र अभियांत्रिकी संशोधन संस्था ( मेरी)) ,नाशिक येथे कार्यरत आहे.या संस्थेंतर्गत मुख्यतः जलसंपदा विभागातील विविध प्रकल्पांच्या क्षेत्रीय समस्यांशी संबंधित उपयोजीत संशोधनाची (Applied Research) कामे केली जातात. राज्य स्तरावरील संशोधन संस्था असल्याने संपूर्ण महाराष्ट्र हे मेरीचे कार्यक्षेत्र आहे. राज्यातील जलसंपदा, सार्वजनिक बांधकाम व महाराष्ट्र जीवन प्राधिकरण या विभागातील तसेच राज्याबाहेरील संशोधन विषयक कामे हाताळली जातात.

या संस्थेमध्ये संधोधन कामांव्यतिरिक्त बांधकाम सामग्रीच्या गुणवत्ता चाचण्या, मृद चाचण्या, रस्त्यांच्या चाचण्या, मिश्र संधानक संकल्पन ही कामे केली जातात. तसेच सुदुर संवेदन तंत्राने जलाशयातील गाळ सर्वेक्षणाचे कामे, पीक मोजणीची कामे इ. कामे केली जातात. निमशासकीय आणि खाजगी संस्थाकडून येणा-या कामासंबधीचे उपायोजित संशोधन व चाचणी कामेही केली जातात.

आपले अखत्यारीतील मान्यताप्राप्त नाशिक जिल्हयातील व इतर अभियांत्रिकी महाविद्यालयातील स्थापत्य पदवी तसेच पदविका मध्ये शिकत असलेल्या विद्यार्थ्यांसाठी महाराष्ट्र अभियांत्रिकी संशोधन संस्था (मेरी)) ,नाशिक येथे क्षेत्रिय भेट आयोजित केल्यास त्यांच्या ज्ञानात भर पडेल व अभियांत्रिकी कौशल्य वाढण्यास वाव मिळेल.

सदर विषयी आपण आपले स्तरावरुन नाशिक जिल्हयातील आपले अखत्यारीतील अभियांत्रिकी महाविद्यालये तसेच तंत्रनिकेतन विद्यालये यांना अवगत करावे व त्यांच्या क्षेत्रिय भेटी या संस्थेत आयोजित करण्याविषयी निर्देश देण्यात यावेत ही विनंती. तसेच या सर्व महाविद्यालये व तंत्रनिकेतने यांची अद्यावत पत्ते, दुरध्वनी क्रमांक व ई-मेल या संस्थेस उपलब्ध करुन देण्यात यावेत ही विनंती

( कि. ज. देशमुख )
प्रशासन अधिकारी,
महाराष्ट्र अभियांत्रिकी संशोधन संस्था,
नाशिक ४२२ ००४

**प्रत** :- मा.अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र अभियांत्रिकी संशोधन संस्था, नाशिक यांना माहितीस्तव सविनय सादर.